## भारतीय कृषी अनुसंधान संस्था, केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर येथील शास्त्रज्ञांची कृषि विज्ञान केंद्र, धुळे ला भेट

भारतीय कृषी अनुसंधान संस्था, नवी दिल्ली अंतर्गत केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर येथील डॉ. जयंत मेश्राम, प्रमुख शास्त्रज्ञ आणि डॉ. शिवाजी ठुबे, शास्त्रज्ञ यांनी ३१ ऑगस्ट, २०२४ रोजी कृषी विज्ञान केंद्र, धुळे ला भेट दिली.

या भेटीदरम्यान, डॉ. जयंत मेश्राम आणि डॉ. शिवाजी ठुबे यांनी कृषी विज्ञान केंद्राच्या विविध उपक्रमांची माहिती घेतली. कृषि विज्ञान केंद्राच्या माध्यमातून धुळे जिल्ह्यातील चार तालुक्यांमध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध विस्तार कार्यक्रमांचा आढावा घेतला. केंद्रीय कृषिमंत्र्यांच्या आदेशानुसार, भारतातील सर्व कृषी विज्ञान केंद्रांचा आढावा घेण्याची सार्वत्रिक मोहीम सुरू आहे, त्याच अंतर्गत ही भेट झाली.

डॉ. जयंत मेश्राम आणि डॉ. शिवाजी ठुबे यांनी कृषी विज्ञान केंद्राच्या विविध उपक्रमांना भेटी दिल्या, जसे की उद्यानविद्या रोपवाटिका, फळ प्रक्रिया युनिट, नैसर्गिक शेती, गांडूळ खत निर्मिती युनिट, एकात्मिक शेती पद्धत, कापूस दादा लाड तंत्रज्ञान प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, माती व पाणी परीक्षण युनिट, बिजोत्पादन प्लॉट, चारा पिक प्रात्यक्षिक प्रक्षेत्र,फळबाग, पिक संग्रहालय इत्यादी. त्यांनी सर्व प्रक्षेत्रांची पाहणी करून शास्त्रज्ञांशी संवाद साधला.

सकाळच्या सत्रात कृषी विज्ञान केंद्र, धुळे चे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. दिनेश नांद्रे यांनी मागील तीन वर्षातील विविध विस्तार कार्यांचे सादरीकरण केले. दुपारच्या सत्रात कृषि विज्ञान केंद्र चे लाभार्थी शेतकरी यांचे शेतावर तसेच शेती आधारित उद्योग असलेल्या शेती उद्योजकांच्या युनिट ला भेट दिली. यामध्ये प्रामुख्याने श्री. मिलिंद बाविस्कर, धुळे, यांचे सारंग गोंधळी मसाले उद्योग यांचा समावेश होता. युनिट ला भेटी दरम्यान शास्त्रज्ञांनी मसाला प्रक्रिया उद्योग मधील मशिनरी, पॅकिंग व्यवस्था, विक्री व पणन व्यवस्था आणि नमुने (samples) ची पाहणी केली. मिलिंद बाविस्कर यांची प्रक्रिया उद्योग मधील

सुरुवात आणि PMFME योजने मधून त्यांना व्यवसाय वृद्धिंगत करण्यासाठी झालेला फायदा या ही बाबी माहीत करुन घेतल्या.

सुराय तालुका शिंदखेडा येथील शेतकरी श्री. हरपाल सिंग धनसिंग गिरासे आणि श्री. उत्तम चिंतामण तावडे यांच्या शेतावर जाऊन कापूस लागवड व दादा लाड तंत्रज्ञान याबद्दल आयोजित कार्यशाळेत डॉ. जयंत मेश्राम आणि डॉ. शिवाजी ठुबे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला आणि कापसाच्या उत्पादन वाढीसाठी आवश्यक तंत्रज्ञानाविषयी मार्गदर्शन केले. तसेच राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियाना अंतर्गत सामुहिक पिक प्रात्यक्षिक प्रक्षेत्राला भेट दिली.

सदरील भेटी दरम्यान धुळे जिल्ह्यातील प्रगतशील शेतकरी, महिला शेतकरी, शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे शेतकरी उपस्थित होते.

डॉ. जयंत मेश्राम आणि डॉ. शिवाजी ठुबे यांनी कृषी विज्ञान केंद्राच्या कार्यप्रणालीवर समाधान व्यक्त केले आणि शेतकऱ्यांच्या विकासासाठी सतत कार्यरत राहण्याची अपेक्षा व्यक्त केली.



कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथील कापूस श्री दादा लाड तंत्रज्ञान प्लॉट ला भेट




केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर येथील डॉ. जयंत मेश्राम, प्रमुख शास्त्रज्ञ आणि डॉ. शिवाजी ठुबे, शास्त्रज्ञ यांच्या समवेत कृषि विज्ञान केंद्र, धुळे चे अधिकारी कर्मचारी आणि शेतकरी बंधू-भगिनी




सुराय ता. शिंदखेडा येथील कापूस श्री दादा लाड तंत्रज्ञान प्लॉट ला भेट